Shri Wagheshwar Gramvikas Pratishtan's

**Shri Vasantrao Pharate-Patil Arts, Commerce and Science College**

Mandavgan Pharata Tal: Shirur, Dist: Pune,Pincode: 412211.

Affiliated to Savitribai Phule Pune University, Pune (ID No PU/PN/AC/392/2009)

AISHE Code: C-41832 Unipune ID: CAAP014910 Tel.No-(02137) 262222

Website-www.svppcollege.com E-Mail-acscollege09@gmail.com

================================================================

# Vachan Prerna Divas Report

15th October, 2022

'Vachan Prerna Divas' or Reading Day was celebrated on 15th October, 2022 to honor the birth anniversary of our late President Dr. APJ Abdul Kalam Sir, who loved reading and writing. This day was celebrated so that the students understand the importance of reading and are encouraged to develop it as a hobby.

The event started with a prayer service on Dr. APJ Abdul Kalam in English by Mr. Anil Bhise and information on the importance of reading was given by Mrs.Surekha Deshmukh. As part of the reading activity all students were made to read 'Song of Youth' written by Dr. APJ Abdul Kalam. A special Video was shown to the students on the 'Importance of books' in our life. Abdul Kalam's Quotes were displayed and students were motivated to memorize it by heart. Students were given books to read. Students took a vow to make reading a habit.

The event has surely helped all the participants to encourage and motivate them for reading technical as well as non-technical books. In addition to this, the event has enabled the students to boost up their knowledge apart from curriculum.

Shri Vasantrao Pharate-Patil Arts Commerce & Science College ★ Mandavgan Pharata, Tal-Shirur, Dist-Pune-412211

PRINCIPAL
SHRI VASANTRAO PHARATE-PATIL ART'S, COMMERCE & SCIENCE COLLEGE, MANDAVGAN PHARATA
TAL.SHIRUR, DIST. PUNE 412211





Shri Vasantrao Pharate-Patil Arts Commerce & Science College ★
Mandavgan
Pharata,
Tal-Shirur,
Dist-Pune-412211

पुढारी

# डॉ. कलामांच्या चरित्रातून तरुणांना मिळेल दिशा

**मांडवगण फराटा : पुढारी वृत्तसेवा**



मांडवगण फराटा (ता. शिरूर) येथील फराटे पाटील शैक्षणिक संकुलात माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांची जयंती व वृत्तपत्र विक्रेता दिन साजरा करण्यात आला.

**राजीव फराटे पाटील यांचे मत**

माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांनी देशाला महासत्ता बनविण्याचे स्वप्न हे तरुणांच्या जिवावरच पाहिले होते. २०२० पर्यंत भारत महासत्ता होईल, असे भाकित डॉ. कलाम यांनी व्यक्त केले होते. कारण देशातील तरुणांकडून त्यांना खूप अपेक्षा होत्या. तसेच डॉ. कलाम यांचे चरित्र अभ्यासल्यास युवकांना जगण्याची नवी दिशा मिळेल, असे मत संस्थेचे अध्यक्ष राजीव फराटे पाटील यांनी व्यक्त केले.

ते मांडवगण फराटा (ता. शिरूर) येथील श्री वसंतराव फराटे पाटील कला वाणिज्य व विज्ञान लोकनेते दादा पाटील फराटे कॉलेज ऑफ फार्मसी व फराटे पाटील कॉलेज ऑफ डी फार्मसी या महाविद्यालयातील ग्रंथालय विभाग योजना आणि विद्यार्थी विकास मंडळ व दै. 'पुढारी' यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त आयोजित वाचन प्रेरणा दिन कार्यक्रमात बोलत होते. यावेळी प्रमुख व्याख्यात्या म्हणून प्रा. सुरेखा देशमुख यांनी मत व्यक्त करताना डॉ. कलाम यांचे व्यक्तीचरित्र व त्यांनी देशासाठी केलेले कार्य यावर विचार मांडले. प्रा. जयराम पवार, प्रा. प्रतीक्षा कोठारी तसेच विद्यार्थी सविता निकम यांनीही आपली मते मांडली. यावेळी मांडवगण फराटा येथे गेले ३५ वर्षांपासून पेपर वितरणाचे काम करणारे प्रमोद चौधरी यांचा सत्कार करण्यात आला. प्राचार्य प्रवीण कुरुमकर, प्राचार्य डॉ. हेमंत कांबळे, प्राचार्य विवेक सातपुते, प्राचार्य संदीप कोकरे तसेच ग्रंथालय विभाग प्रमुख प्रा. गणेश खोडवे, प्रा. ए. एस. थोरात, प्रा. आर. व्ही. पवार, रासेयोच्या प्रा. सोनाली म्हेत्रे, प्रा. विकास गडदे, विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. रमेश शितोळे, प्रा. अविनाश ढोबळे, तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सूत्रसंचालन प्रा. रमेश शितोळे यांनी केले, तर प्रा. विकास गडदे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

My Gramin Edition
Oct 16, 2022 Page No. 5
newspaper.pudhari.co.in

Shri Vasantrao Pharate-Patil Arts Commerce & Science College
Mandavgan
Pharata,
Tal-Shirur,
Dist-Pune-412211

लोकमत

# डॉ. कलमांच्या चरित्रातून तरुणांना दिशा मिळेल : राजीव फराटे

## फराटे पाटील शैक्षणिक संकुलात वाचन प्रेरणा दिन साजरा

लोकमत न्यूज नेटवर्क

**रांजणगाव सांडस:** मांडवगण फराटा (ता. शिरूर) डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांनी देशाला महासत्ता बनविण्याचे स्वप्न हे तरुणांच्या जीवावरच पाहिले होते. २०२० पर्यंत भारत महासत्ता होईल असे मत डॉ. कलाम यांनी व्यक्त केले होते कारण देशातील तरुणांकडून त्यांना खूप अपेक्षा होत्या तसेच डॉक्टर कलाम यांचे चरित्र अभ्यासल्यास युवकांना जगण्याची नवी दिशा मिळेल ते मत राजीव फराटे पाटील यांनी व्यक्त केले.

येथील श्री वसंतराव फराटे पाटील कला, वाणिज्य व विज्ञान लोकनेते दादा पाटील फराटे कॉलेज ऑफ फार्मसी व फराटे पाटील कॉलेज ऑफ डी फार्मसी या महाविद्यालयातील ग्रंथालय विभाग योजना आणि विद्यार्थी विकास मंडळ व शिरूर तालुका पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला त्यानिमित्त ते बोलत होते.



दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात करताना मान्यवर.

प्रा. सुरेखा देशमुख यांनी डॉ. कलाम यांचे व्यक्ती चरित्र व त्यांनी देशासाठी केलेले कार्य यावर विचार मांडले. डॉ. कलाम यांना शास्त्रज्ञ म्हणून आपली ओळख दाखविण्यापेक्षा एक शिक्षक म्हणून ओळख दाखविण्यात अभिमान वाटत होता असेही त्या यावेळी म्हणाल्या.

प्रा. जयराम पवार, प्रा प्रतीक्षा कोठारी तसेच विद्यार्थीनी सविता निकम यांनीही आपली मते मांडली. यावेळी प्राचार्य प्रवीण कुरुमकर, प्राचार्य डॉ. हेमंत कांबळे, प्राचार्य विवेक सातपुते, प्राचार्य संदीप कोकरे एम फॉर्म विभाग समन्वयक प्रा. संतोष वाघमारे तसेच ग्रंथालय विभाग प्रमुख गणेश खोडवे, ए एस थोरात, आर. व्ही. पवार, जयराम पवार, सोनाली म्हेत्रे, विकास गडदे, रमेश शितोळे, अविनाश ढोबळे, तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन रमेश शितोळे यांनी केले तर विकास गडदे यांनी उपस्थितांचे आभार मानले.



Shri Vasantrao Pharate-Patil Arts Commerce & Science College
Mandavgan Pharata,
Tal-Shirur,
Dist-Pune-412211